Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 7TH JANUARY 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### जनरल डिपार्टमेंट.

मुकाम बंदिरे मुंबई, तारीख १ माहे डिसेंबर सन १८९६.

नंबर ९२६३.—हेज्जाजमध्यें तुर्कसरकारचे पासपोर्टसंबंधी जे नियम अमलांत आहेत त्यांअन्वयें जरूर असणारे पासपोर्ट मिळवून ठेवणें हें किती फायदेशीर आहे हें हेज्जाजास जाणाऱ्या कांहीं हाजी लोकांस समजत नाहीं ही गोष्ट आलीजाह गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणिल्यावरून सर्व लोकांस असें जाहीर होण्याची त्यांची इच्छा आहे कीं, पासपोर्ट आपणासाठीं घेणें किंवा न घेणें हें हेज्जाजास जाऊं इच्छिणाऱ्या हाजी लोकांच्या अगदीं मर्जीवर ठेविलें आहे तरी, तें पासपोर्ट कोणतीही फी दिल्याशिवाय हिंदुस्थानांतील सर्व स्थानिक अधिकाऱ्यांकडे मिळूं शकतात; बरोबर पासपोर्ट असल्याशिवाय एकादा हाजी हेज्जाजास जाऊन पोंचला तर त्याला, तुर्क सरकारचे पासपोर्टसंबंधी जे नियम आहेत त्यांअन्वयें, ब्रिटिश कान्सलकडून पासपोर्ट मिळण्याच्या आधीं, जेद्दा येथें, दुप्पट फी ह्मणजे ४० पिआस्टर्स (सुमारें चार रुपये दहा आणे) देणें जरूर पडेल, आणि त्या ठिकाणीं त्यानें पासपोर्ट मिळविण्याची हयगय केली तर तुर्क सरकारच्या मुलुखांतील पवित्र मानिलेल्या स्थानांस जाण्याचा त्याला कदाचित प्रतिबंधही होईल. याकरितां, पासपोर्ट न घेतल्यानें हाजी लोकांस जो त्रास, जी गैरसोय व जो निष्कारण खर्च होण्याचा संभव आहे त्यापासून त्यांचा बचाव व्हावा ह्मणून, हिंदुस्थान सोडण्याच्या आधीं पासपोर्ट घेऊन ठेवणें किती इष्ट आहे तें त्यांच्या मनांत चांगलें ठसावें अशी सरकारची इच्छा आहे.

२. हेज्जाजास जाण्याचा इरादा असलेल्या हाजी लोकांजवळ रिटर्न तिकिटें व जावयाच्या आणि परत यावयाच्या प्रवासांत सर्व खर्च भागण्यापुरते पैसे असणें हेंही इष्ट आहे. पुरेसा पैसा आणि रिटर्न तिकिटें हीं असलींच पाहिजेत असें सरकारचें ह्मणणें नाहीं, परंतु हेज्जाजास गेल्यानंतर तेथें अनाथ होऊन बसणें आणि आपल्या घरीं परत येण्याची ऐपत न राहणें ह्या गोष्टींपासून किती अडचणी उत्पन्न होतील याचा हाजी लोकांनीं स्वतःच विचार करावा.

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादूर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. डीसी. आट्किन्स,

सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुंकाम जंजिरे मुंबई, तारीख १४ माहे डिसेंबर सन १८९६.

नंबर १०२३०—मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची आधीं मंजुरी आणवून, पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२ वा), कलम ८, ह्याअन्वयें, त्या कलमाखालीं केलेल्या व *रकान्यांत निर्दिष्ट केलेल्या जाहिरनाम्यांत प्रसिद्ध केलेल्या कानूंपैकीं कानू १६ वी व १८ वी ह्यांत, खालीं लिहिलेले फेरफार केले आहेत:—

* १८९० चें मुंबई सरकारी गझेट भाग, १ पृष्ठें ३४१ ते ३४४, ह्यांवर, आणि सन १८९३ चें मुंबई सरकारी गझेट, भाग १, पृष्ठें ६१३ ते ६१८ ह्यांवर प्रसिद्ध केलेले जाहिरनामे नंबर २७४३, व ५०१८, तारखा अनुक्रमें २२ एप्रिल १८९० व ११ जुलई १८९३.

(१) कानू १६, हींत, सुरवातीस, "खालीं, कानू १८ (२) हींत सांगितलेला प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं" हा मजकूर दाखल करावा.

(२) कानू १८, हिच्या (२) रकमेच्या बदला, खालील मजकुर दाखल करावा:—

पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें आयात केलेलें असेल तेव्हां, तें, एक होज व एक घडींव लोखंडाची नळी ह्यांच्या साह्यानें तारवांतून काढून सांठवणाच्या टांक्यांत पंप केलें पाहिजे. हवा व यंत्रें अनुकूल असल्यास, सदर्हू तेल काढण्याचें काम, संपेपर्यंत, रात्रंदिवस एकसारखें चालू ठेविलें पाहिजे. रात्रीं काम चालत असेल तेव्हां फक्त विजेच्या दिव्यांचा उपयोग केला पाहिजे, आणि तारवांतलें तेल काढण्याचें काम संपलें ह्मणजे, सांठवणाच्या टांक्यांस लावलेली नळी, किनाऱ्यावरील एका पंपाच्या योगानें तावडतोब रिकामी केली पाहिजे. पिट्रोलियम काढण्याचें काम कोणत्याही कारणानें कोणत्याही वेळीं बंद पडलें तर, सदर्हू नळींत राहिलेल्या तेलाचा कोणताही भाग बाहेर निघून येऊं नये ह्मणून एका व्हाल्वाच्या योगानें पक्का बंदोबस्त केला पाहिजे.

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादुर इन्
कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मांटीथ,
आर्क्टिंग चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.